**फाईल क्रमांक:-१४४२(२)/मविप/२०१७/तेरा-ब** **दि.:- १० फेब्रुवारी, २०२१**

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - २०१७**

**अंतिम निकाल - घोषणा**

आयोगामार्फत दि.२४ डिसेंबर, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा - २०१७ चा अंतिम निकाल **दि. १० फेब्रुवारी, २०२१** रोजी जाहीर करण्यात आला असून या परीक्षेत श्री. बनसुडे विजय सुनिल (बैठक क्रमांक- PN००१०२९) हे उमेदवार राज्यात पहिले आले आहेत.

२. प्रस्तुत पदासाठी शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची शिफारस यादी व गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

३. या परीक्षेस राज्यभरातून पोलीस दलातील ४५२९ उमेदवार बसले होते. त्यापैकी १४५१ उमेदवार शारीरिक चाचणीकरिता पात्र ठरले होते. त्यांची शारीरिक चाचणी आयोगाकडून दि. २४ फेब्रुवारी, २०२० ते दि. १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत पुणे, नाशिक, मुंबई, औरंगाबाद, अमरावती व नाशिक येथे घेण्यात आली होती.

४. प्रस्तुत अंतिम निकालात अर्हताप्राप्त न ठरलेल्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून १० दिवसांत आयोगाकडे Online पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील 'उमेदवारांना सर्वसाधारण सूचना' मधील सूचना क्र. ३.८.३ पहावी).

**ठिकाण : मुंबई**

**उपसचिव (परीक्षा-२)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**